जेथे एकता तेथे सुरक्षितता, संघटनकला संघटन कलयुगे – श्री समर्थ

# महाराष्ट्र राज्य तलाठी पटवारी मंडळ अधिकारी समन्वय महासंघ


बाळकृष्ण गाढवे
सरचिटणीस
स्वामी समर्थ नगर, दारव्हा
ता. दारव्हा जि. यवतमाळ
मोबा. ८८०५९८०३३३

श्याम जोशी
अध्यक्ष
इरिगेशन कॉलनी, सिव्हील लाईन,
वाशिम जि. वाशिम
मोबा ९४२०३९१२५५/९४२२९६०२१८

समन्वय महासंघाचे कार्यालय – द्वारा : जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम ता. जि. वाशिम

श्री. ज्ञानदेव आनंदराव डुबल, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य तलाठी संघ, मु. पो. सैदापूर ता. कराड जि. सातारा मो. ९८५०९६४१७४

श्री. लक्ष्मीकांत काजे, सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य तलाठी संघ, मु. पो. रामकृष्ण नगर, वसमत रोड, परभणी

श्री. बाळकृष्ण गाढवे, अध्यक्ष, विदर्भ पटवारी संघ, नागपूर स्वामी समर्थ नगर, दारव्हा, जि. यवतमाळ

श्री. संजय पांडूरंगजी अनव्हाने, सरचिटणीस, विदर्भ पटवारी संघ, बी-०३, बिदीशा अपार्टमेंट, शिवाजी कॉम्प्लेक्स, न्यू मानकापूर, नागपूर मो. ९८६०९९१४५४

श्री. डी के. काटकर, अध्यक्ष, विदर्भ मंडळ अधिकारी संघ, नागपूर रा. मातोश्री निवास, सिव्हील लाईन, सर्किट हाऊस जवळ, वाशिम मो. ९४२२८१००६७

श्री. शे. बा. चव्हाण, सरचिटणीस, विदर्भ मंडळ अधिकारी संघ, नागपूर रा. सुभेदार एक्सटेंशन, नागपूर प्लॉट नं. २३९ फोन नं.: ०७१२-२७४२७६६

श्री दिलीप देसाई, अध्यक्ष, रत्नागिरी सिंधुदुर्ग जिल्हा तलाठी संघ, रा. बी-2, वेदांत पाराडाईज, थिबा पलेस रोड, रत्नागिरी, जि. रत्नागिरी मो. ८५५२८९९९९

श्री. उमाकांत देशमुख, सरचिटणीस, रत्नागिरी सिंधुदुर्ग जिल्हा तलाठी संघ, बी-१८/१०२, सिद्धिविनायक नगर, शिवाजी नगर, रत्नागिरी, जि. रत्नागिरी मो. ९०४९१८४९४१

विभाग निहाय सदस्यः
टी. जी. सावंत (कोकण)
रवी कुलकर्णी (औरंगाबाद)
अनिल ठोंबरे (औरंगाबाद)
जी. डी. महाले (नाशिक)
व्ही. डी. टेकाळे (अमरावती)
राजेश चुटे (नागपूर)
सी. झेड. बोरकर (नागपूर)


जा. क्र.:-.०२ /२०२०　　　　दिनांकः- . .२०२०

प्रती,

१) मा. मुख्य सचिव
महाराष्ट्र शासन,
मंत्रालय, मुंबई

२) मा. अप्पर मुख्य सचिव
महसूलव वनविभाग, महाराष्ट्र शासन,
मंत्रालय, मुंबई

विषयः- <u>कोविड -१९ चा प्रादुर्भाव रोखणे करिता उपाय योजना</u>
क्षेत्रिय कर्मचार्यांना संरक्षण/ सुविधा मंजूर करणे बाबत

संदर्भ :-१) महाराष्ट्रराज्य तलाठीसंघ, यांचे मागणी निवेदन ५ एप्रिल २०२०
२) विदर्भ पटवारीसंघ नागपूर यांचे निवेदन दि. ५एप्रील

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास नम्रं निवेदन कि, सध्या संपूर्ण जग कोरोन या विषाणूच्या विळख्यात सापडले असून आपला महाराष्ट्र त्यास अपवाद नाही. आपले नेतृत्वात संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा नेटाने काम करीत आहे. राज्य शासनाचे महसूल विभागाचा या मध्ये सिंहाचा वाटा आहे.

राज्यातील शेवटच्या घटकापर्यंत प्रत्यक्ष्य पोहचून त्यांना सर्वतोपरी दिलासा देण्याचे काम क्षेत्रिय स्तरावरील तलाठी /मंडळ अधिकारी संवर्गाचे कर्मचारी करीत आहेत. नागरी भागातील समस्यांना हाताळण्या सोबत ग्रामीण/आदिवासींच्या समस्यांना उपलब्द साधन सामुग्रीच्या आधारे हाताळत आहेत.

अश्याप्रकारे अतिशय महत्वाचा हा घटक शासन स्तरावर उपेक्षित असल्यचे चित्र निर्माण झाले आहे. ग्राम पातळीवर कार्यरत बहुतांश कर्मचारी ग्रामविकास विभागाशी संबंधित आहेत. त्यांना विमा संरक्षणासह अन्य सुविधांचा लाभ देण्यात येतो आहे. महसूल विभागाचे तलाठी/मंडळाधिकारी मात्र साधन- सुविधांचा अभाव असतांना जिव धोक्यात घालून काम करीत आहेत. आपणास नम्र विनंती की खाली नमूद मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार व्हावा.

१) अन्य विभागांप्रमाणे महसूल विभागाचेअधिकारी कर्मचारी विशेषतः तलाठी/मंडळाधिकारी यांना पन्नास लक्ष रुपयांचे विमा संरक्षण पुरविण्यात यावे.
२) तलाठी/मंअ यांना बाधित झाल्यास, औषध उपचारासाठी अग्रिम रक्कम मंजूर करण्यात यावी.
३) दुर्दैवाने कर्मचारी यांचा मृत्यु झाल्यास रु. पन्नास लक्ष सानुग्रह अनुदान मंजूर करण्यात यावे व वारसास प्राधान्याने अनुकंपा तत्वावर सेवेत सामावून घ्यावे.
४) तलाठी/मं.अ. यांचे कार्यालयांना संरक्षक मास्क, स्यानीटायझर, हंडवाश इत्यादी सुविधा पुरविण्यात याव्यात.
५) तलाठी/ मं.अ. यांना त्यांचे नियत कार्यक्षेत्राचे जबाबदारीसह अन्य ठिकाणी लेखी आदेशित करून वा तोंडी आदेश्याने नियुक्त करण्यात येते. हे पूर्णतः नियमबाह्य असून अन्यायकारक आहे. ते ठामपणे संघटना नाकारत आहे. असे आदेश त्वरित रद्द करण्यात यावेत.
६) दिव्यांग / वयस्कर कर्मचारी यांना विशेष सवलती देण्यात याव्यात.
७) राज्यातील लॉकडाऊन मुळे शेतकरीवर्गअडचणीतआहे. आगामी काळात खरिपाच्या पेरणीची सुरुवात होणार असल्याने त्यांचे अडचणींमध्ये वाढ होणार आहे, तर दुसरीकडे लॉकडाऊन मुळे मार्च अखेर जमीन महसूल वसुलीचे काम थांबले आहे. या विषयाचा गांभीर्याने विचार होऊन वसुलीसमुदतवाढ देण्यात यावी.

आपणास नम्र विनंती करण्यात येते की वरील निवेदनाचा सहानुभूतीपूर्वक विचार करण्यात यावा.

करिता सविनय सादर

*आपला नम्र*

(स्वाक्षरी)

अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य तलाठी पटवारी मंडळ
अधिकारी समन्वय महासंघ